संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# हा अंतर्गत दहशतवाद कसा मोडणार?

**महाराष्ट्रातील** लोकसभा निवडणुकीची प्रक्रिया शांततेत पार पडली असताना अगदी महाराष्ट्र दिनाचे निमित्त साधून नक्षलवाद्यांनी गडचिरोलीत भरवलेला हिंसाचार महाराष्ट्र सरकारच्या सुरक्षा व्यवस्थेवरच मोठे प्रश्नचिन्ह निर्माण करणारा ठरतो. शीघ्रकृतीदलाचे जवळपास वीस ते बावीस जवान एका खाजगी वाहनातून जातात. आणि कुरखेडा गावाजवळच्या रस्त्यावर योजनाबध्दरीतीने हा स्फोट घडवला गेला. पोलिसांनी त्याठिकाणी मोठ्या संख्येने यावे म्हणून त्यापूर्वी काही खाजगी गाड्यांची जाळपोळ नक्षलवाद्यांनी केली. यावरून मोठे नुकसान घडवण्यासाठीच हा स्फोट घडवला गेला असे सिध्द होते. सरकारतर्फे त्यांची सारवासारव केली जाईल. स्फोट झाल्यानंतर सरकारकडून ज्या प्रतिक्रिया आलेल्या आहेत. त्या पाहिल्यानंतर सरकारचा गुप्तचर विभाग यासंदर्भात पूर्णपणे अयशस्वी ठरला. आपण सर्जिकल स्ट्राईकच्या गोष्टी करीत असतो. पाकिस्तानच्या भूमीत जाऊन दहशतवाद्यांच्या ठिकाणांवर हल्ले केल्याबद्दल पाठही थोपटून घेतो. परंतु प्रत्यक्ष आपल्याच प्रदेशामध्ये हे दहशतवादी वर्षानुवर्षे ठाण मांडून बसलेले आहेत. आणिअगदी नित्यनेमाने म्हणजे एका विशिष्ट कालावधीनंतर त्यांचे स्फोट घडवणे किंवा हल्ले करणे सुरु असल्याचे दिसून येते. हा माओवाद किंवा नक्षलवाद मोडून काढण्यात सरकारला इतक्या वर्षांनंतरही यश येऊ नये हे आश्चर्यकारकच म्हणावे लागते. देशाच्या काही ठराविक राज्यांमध्ये हा नक्षलवाद अक्षरशः गेल्या पन्नास वर्षापासून धुमाकूळ घालतो आहे. पश्चिम बंगाल, ओरिसा, बिहार, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, झारखंड, छत्तीसगढ या ठिकाणी नक्षलवादी किंवा माओवाद्यांची अजूनही पकड असल्याचे दिसून येते. आदिवासी आणि घनदाट जंगल असलेला परिसर हे नक्षलवादी जाणीवपूर्वक निवडतात आणि आपले उद्दीष्ट साध्य करण्याचा प्रयत्न करतात. केवळ सरकारविरोधी भूमिका घ्यायची आणि आपण स्थानिक ग्रामस्थांचे किंवा आदिवासींचे एकमेव तारणहार आहोत, असे भासवण्यासाठी प्रयत्न करतात. त्यांनी आतापर्यंत केवळ दहशत आणि हिंसाचाराचाच मार्ग अवलंबलेला आहे. भारतासारख्या लोकशाहीवादी देशात सहजपणे उपलब्ध होणाऱ्या स्वातंत्र्याचा या लोकांकडून अत्यंत गैरवापर होतो.

### पन्नास वर्षे जुना दहशतवाद

एकेकाळी या चळवळीमागे फार मोठे तत्वज्ञान आहे असे चित्र निर्माण करण्याचा प्रयत्न झाला. परंतु केवळ हिंसाचार हा कोणत्याही तत्वज्ञानाचा आधार बनू शकत नाही हे शहरातल्या अनेक उदाहरणांवरून सिध्द झाले आहे आणि म्हणूनच सर्व प्रकारचा हिंसाचार हा दहशतवादाचाच भाग असतो. नक्षलवाद हाही त्याचेच एक अंग असल्याने तोदेखील तितक्याच कठोरपणे मोडण्याची आता वेळ आलेली आहे आश्चर्याची गोष्ट अशी आहे की, १६ जवान त्यामध्ये शहीद झाले असताना राज्य आणि केंद्र सरकारकडून केवळ निषेधाची पत्रके फडकवली गेली. ज्या कारणांमुळे हा स्फोट घडवणे शक्य झाले. त्याच्या चौकशीचे आदेश दिले गेलेले नाहीत. कारण अतिशय योजनापूर्वक कुरखेडा रस्त्यावर भुसुरुंग पेरले गेले. नक्षलवादी नेहमीच या भुसुरुंगाचा वापर करीत असतात. त्यांच्या हल्ल्याची पध्दतही साधारणपणे पोलिसांना माहिती आहे. असे असूनही भुसुरुंग शोधण्याचे तंत्र जर सरकारने उपलब्ध करून दिले नसेल तर तो सरकारचाच मोठा पराभव मानायला हवा. कारण आज सुरुंगच काय कोणत्याही प्रकारची स्फोटके तंत्राच्या माध्यमातून शोधता येणे शक्य आहे. परंतु याबाबतची तातडी किंवा आवश्यकता सरकारी यंत्रणांकडून दाखवली गेली नाही हे स्पष्ट होते. ज्याप्रमाणे २६/११ ला मुंबईवर झालेल्या हल्ल्याच्यावेळी पोलिसांना जीवनरक्षक जॅकेटस उपलब्ध करून दिली नव्हती. जी होती तीदेखील अपूर्ण आणि निकृष्ट दर्जाची होती त्यामुळे चांगल्या कार्यक्षम अधिकाऱ्यांनाही त्यात हुतात्मा व्हावे लागले. नक्षलवादाशी सामना करण्याकरीता राज्याच्या अर्थसंकल्पात भरघोस रकमेची तरतूद केलेली आहे, अगदी स्वतंत्र पोलीस दल, स्वतंत्र पोलीस महासंचालक अशा सगळ्या व्यवस्था निर्माण केलेल्या आहेत. चंद्रपूर, गडचिरोली इथल्या अतिशय दुर्गम भागामध्ये पोलिसांची सतत गस्त राहावी. किंबहुना नक्षलवाद्यांच्या प्रत्येक हालचालीवर लक्ष ठेवता यावे म्हणून ही स्वतंत्र व्यवस्था कार्यान्वित केली गेली. परंतु गेल्या सहा महिन्यात नक्षलवाद्यांनी मोठे स्फोट घडवले आहेत. छत्तीसगढमध्ये तर निवडणुकीपूर्वीच त्यांनी स्फोट घडवण्याचा कट यशस्वी केला. ही जर वस्तुस्थिती असेल तर पाकिस्तानच्या भूमित असलेला दहशतवाद भारतासाठी जितका त्रासदायक आहे तितकाच देशाच्याच भूमित असलेला हा पाकिस्तानी मनोवृत्तीचा दहशतवादही तितकाच धोकादायक ठरतो.

### अंतर्गत सुरक्षिततेपुढचे प्रयत्न

या हल्ल्याने जणुकाही पुलवामा हल्ल्याची आठवण करून दिली. त्यातला फरक एवढाच होता की, पुलवामा हल्ला हा आत्मघातकी पथकाने घडवला होता परंतु सुरक्षा रक्षकांच्या वाहनाला उडवल्याने एकाचवेळी चाळीस जवानांचे बळी गेले होते. नक्षलवाद्यांनी तीच पध्दत वापरून वाहन उडवण्याचा कट यशस्वी केलेला दिसतो म्हणूनच सोळा जवानांना आपले प्राण गमवावे लागले. कदाचित ही संख्या वाढण्याचीही शक्यता आहे. मूठभर नक्षलवादी वर्षाकाठी शंभर ते दीडशे जवानांचे बळी घेत असतात आणि देशाची अंतर्गत सुरक्षितता अस्थिर करीत असतात त्यांचा अधिक कठोरपणे बंदोबस्त व्हायला हवा. हल्ला झाल्यानंतर सरकारी यंत्रणा जाग्या होतात आणि माओवाद्यांना चोख उत्तर दिले जाईल, अशा प्रकारच्या वल्गना होतात. परंतु नक्षलवाद्यांची ठिकाणे शोधून काढण्यात आपल्या सुरक्षा यंत्रणा अपयशी ठरत आहेत हे मान्य करावे लागेल. गडचिरोली किंवा छत्तीसगढचे जंगल जे काही अगदी काश्मिर खोरे नाही की ज्या ठिकाणी दहशतवाद्यांना लपून राहाता येणे सोयीचे होते. ही सगळी जंगले सगळ्या आधुनिक कार्यपध्दती वापरून पिंजून काढता येऊ शकतात. किंबहुना हेही शक्य होत नसेल तर बालाकोटसारख्या कारवाया करून ही कीड संपवावी लागेल. कोणत्याही कारणाशिवाय शेकडो जवानांचे बळी जाणे देशाला परवडणारे नाही. लोकशाही उलथवून टाकण्याची वल्गना करणाऱ्या माओवाद्यांना आता यापुढे एकही संधी मिळणार नाही किंवा त्यांचे दिवस भरले आहेत अशा प्रकारच्या कारवाईचे केंद्र आणि राज्य सरकारने मोहीम आखली पाहिजे. तरच अंतर्गत सुरक्षितता सरकारच्या नियंत्रणात आहे असे म्हणता येईल.